**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १४९/२०२५**
**सरकार –वि– कदिरखान मुस्तफा पठाण**
नि. क्र. ११ खाली
CNR No. MHCH070002662025

## न्यायनिर्णय

( घोषीत दिनांक ०५ ऑगस्ट, २०२६ )

उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्यात खालील मुद्दे निष्कर्षासाठी उपस्थित झाले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालील प्रमाणेः–

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०७.११.२०२४ रोजी १७.१० ते १८.१० वाजेच्या मौजा चंदनखेडा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील एका कापडी पिशवीत देशी दारु रॉकेट संत्रा कंपनीच्या प्रत्येकी ९० मि.ली.च्या एकूण १५० बाटल्या विनापरवाना, बेकायदेशिररीत्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | अंतिम आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त केले. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ व २ करीता–**

**०२.** आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकामी अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनाम्यावरील सा.क्र.१ अमोल भाऊराव कवाडे याची साक्ष पंच साक्षीदार म्हणून नोंदविण्यात आली आहे. त्यानंतर, उर्वरित साक्षीदारांना वारंवार साक्ष–समन्स काढले असता त्यांची उपस्थिती प्राप्त होत नसल्याने दि.३१.०३.२०२६ रोजी नि.क्र.१ वरील आदेशाप्रमाणे अभियोग पक्षास उर्वरित साक्षीदारांचा पुरावा नोंदविण्याकरिता शेवटची संधी दिली होती. परंतू अभियोग पक्षाला

साक्षीदारांची उपस्थिती निश्चीत करुन त्यांची साक्ष अभिलेखावर नोंदविता आलेली नाही. आरोपीविरुध्द अभिलेखावर गुन्हादर्शक पुरावा मिळून न आल्याने दि.२९.०६.२०२६ नि.क्र.१ वरील आदेशान्वये त्याला फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३ अन्वयेच्या निवेदनातून अभिमुक्त करण्यात आले.

**०३.** प्रस्तूतच्या प्रकरणात तपासण्यात आलेले सा.क्र.१ अमोल कवाडे याच्या साक्षीत असे आले आहे की, राज्य उत्पादन शुल्क पोलीसांनी त्याला पंच साक्षीदार म्हणून कुठेही बोलाविले नव्हते, त्यांनी त्याच्यासमक्ष पंचनाम्याची काहीही कार्यवाही केली नाही. त्याला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला असता त्याने त्यावरील आपली सही मान्य केली. परंतू, त्यातील मजकूराबाबत माहीती नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास समर्थन न केल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी त्याला न्यायालयाच्या परवानगीने उत्तर सुचक प्रश्न विचारले. परंतू त्याच्या साक्षीतून अभियोग पक्षाला उपयोगात येईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची पुरावा अभियोग पक्षास उपयूक्त ठरत नाही.

**०४.** अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवूनही अभियोग पक्ष फिर्यादी, इतर साक्षीदार आणि तपासी अधिकारी यांचा पूरावा नोंदवू शकला नाही. सदर प्रकरणात फिर्यादीचा पूरावा नोंदविण्यात आला नसल्याने फिर्याद मधील मजकूर सिध्द झालेला नाही. तसेच दोषारोपपत्राचे अवलोकन केले असता तपासी अधिकाऱ्यांनी कुठल्याही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा जबाब तपासादरम्यान नोंदविला नसल्याचे आढळून येते. सदर प्रकरणात रासायनिक परीक्षण अहवाल, कायमी रिपोर्ट, प्रथम खबरी अहवाल, पंचनामा, सी.ए. फॉर्म इत्यादी महत्त्वाचे दस्त सिध्द झाले नाहीत. त्यामूळे आरोपीचा जप्त मुद्देमालाशी संबंध असल्याबाबत कुठलाही पुरावा अभिलेखावर आला नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द लावण्यात आलेल्या कलमामधील संपूर्ण

घटक सिध्द करणारा कुठलाही पुरावा न्यायालयासमोर न आल्याने आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. या कारणास्तव मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी देत मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी **कदिरखान मुस्तफा पठाण**, याची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) खालील अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३) जप्त मुद्देमाल – देशी दारु रॉकेट संत्रा कंपनीच्या प्रत्येकी ९० मि.ली.च्या एकूण १५० बाटल्या अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, चंद्रपूर यांच्या कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात याव्यात.

४) जप्त मुद्देमाल – डिस्पोजल ग्लास २ सेट, हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावेत.

५) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये रक्कम रुपये १५,०००/– चे बंधपत्रासह जमानतपत्र द्यावे. सदरचे जमानतपत्र सहा महिन्याचे कालावधीकरीता अंमलात राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by APARNA ROHIDAS DEORE
Date: 2026.08.05 17:50:41 +0530

**(ए. आर. देवरे)**

दिनांकः ०५.०८.२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) भद्रावती.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | जी. डी. किटे |
| न्यायालयाचे नाव | : | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,<br>(न्यायालय क्र.२) भद्रावती. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०५.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०५.०८.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०५.०८.२०२६ |

............